आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित,
बी.डी.काळे महाविद्यालय,घोडेगाव ता.आंबेगाव जि.पुणे
मराठी विभाग
**वार्षिक कामकाज अहवाल २०२१–२०२२**

महाविद्यालयातील मराठी विभाग ऑगस्ट १९९३ मध्ये सुरू झालेला आहे.विभागामध्ये पदवी व पदव्युत्तर असे दोन विभाग कार्यरत आहे.त्यांची वर्गनिहाय विद्यार्थी संख्या खालीलप्रमाणे

| अ.क्र. | वर्ग | मुले | मुली | एकुण |
|---|---|---|---|---|
| १. | द्वितीय वर्षकला | १३ | ०७ | २० |
| २. | तृतीय वर्षकला | ०८ | ०७ | १५ |
| ३. | एम.ए.भाग १ | ०८ | ०५ | १३ |
| ४. | एम.ए.भाग २ | ०६ | ०५ | ११ |
| | | | एकुण | ५९ |

**मराठी विभागाने राबविलेले उपक्रम खालीलप्रमाणे**

**१) विद्यार्थीसभा**

मराठी विभागातील विद्यार्थ्यांची सभा दि. ०१/०८/२०२१ रोजी आयोजित करण्यात आली होती.याप्रसंगी विभागप्रमुख प्रोफेसर डॉ.ज्ञानेश्वर वाल्हेकर यांनी मार्गदर्शन केले.विभागातील सहा.प्राध्यापक डॉ.पुरुषोत्तम काळे, पोपट माने इ.उपस्थित होते.

**२) राष्ट्रीय वेबिनार**

मराठी विभागाच्या वतीने १८ ऑक्टोबर २०२१ रोजी **'बदलत `आदिवासी समाजजीवन आणि आदिवासी साहित्य'** या विषयावर राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आल होते. या वेबिनारचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा.डॉ.विलास उगले यांनी केले. याप्रसंगी अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय, वसईरोड येथील प्रा.डॉ.सखाराम डाखोरे यांनी 'आदिवासी कवितेतील बदलत्या जाणिवा' या विषयावर विचार मांडले.२०० विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते.

**३) ऑनलाईन कवी संमेलन**

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने निमंत्रित कवीच्या ऑनलाईन कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. या काव्यसंमेलनात मा.बाबाराव मडावी (यवतमाळ),मा.उषाकिरण आत्राम (गोंदिया), मा.डॉ.संतोष पवार (श्रीरामपूर), मा.संतोष पावरा (शहादा), डॉ.दिलीप कसबे (चाकण), डॉ.गणेश सोनवणे (पाबळ), डॉ.हनुमंत भवारी (पाबळ), मा.प्रशांत वाघ (येवला), मा.भाऊसाहेब थोरात (घोडेगाव), डॉ.जयसिंग गाडेकर (आळे), मा.समाधान गायकवाड (सोलापूर), मा.स्नेहल सोनटक्के (सोलापूर), मा.मनोहर मोहरे (फुलवडे), मा.संतोष केंगले (जांभारी), डॉ.प्रभाकर मोकळ (घोडेगाव), मा.शितल बोऱ्हाडे (खेड), डॉ.शिवाजी गायकवाड (उस्मानाबाद), डॉ.विजयकुमार भवारी (पुणे), निसर्गकवी नितीन सावळे (नाशिक) इ. महाराष्ट्रातील नामवंत कवी सहभागी झाले होते.१०० विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते.

**४)लेखक आपल्या भेटीला – ऑनलाईन व्याख्यान**

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने सोमवार दि. २४ जानेवारी २०२२ रोजी 'लेखक आपल्या भेटीला' या उपक्रमांतर्गत सावित्रीबाई फुल विद्यापीठाच्या प्रथम वर्ष कला या वर्गाच्या मराठी विषयाच्या बाजा या कथेच्या लेखिका, महाराष्ट्रातील ख्यातनाम आदिवासी कवयित्री मा.उषाकिरण आत्राम यांच्या ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.१०० विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते.

**५) लेखक आपल्या भेटीला – ऑनलाईन व्याख्यान**

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने सोमवार दि. २८फेब्रुवारी २०२२ रोजी 'लेखक आपल्या भेटीला' या उपक्रमांतर्गत ज्येष्ठ आदिवासी साहित्यिक कथाकार, कादंबरीकार, समीक्षक, आकांतकार मा. बाबाराव मडावी,यवतमाळ यांचे 'कथा, आत्मकथन आणि कादंबरीची निर्मिती प्रक्रिया' या विषयावर गुगलमीटवर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.१०० विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते.

### सेट नेट परीक्षेत यश

यावर्षी घेण्यात आलेल्या राज्य आणि राष्ट्रीय प्राध्यापक पात्रता परीक्षेत मराठी विभागामध्ये पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेतलेले श्री.नितीन रणजित बटुळे याने सेट तर श्री.चंद्रकांत भवारी याने नेट परीक्षेत यश प्राप्त केले आहे. संस्था, महाविद्यालय, मराठी विभाग व शिक्षकांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

**शोधनिबंध विषयक कार्य : प्रोफेसर डॉ.ज्ञानेश्वर वाल्हेकर,उपप्राचार्य,मराठी विभागप्रमुख.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | उषाकिरण आत्राम यांच्या म्होरकी मधील काही लक्षवेधक कविता | Sanskruti International Multidisciplinary Research Journal Vol. VI Issue – I IFSIJ Impact Factor : 5.565 URL:www.simrj.org.in Journal UOI:1.01/simrj Indexed, Peer-Reviewed International Journal | E ISSN 2455-1511 | July to Sept.2020 |
| २ | कवी सुनील कुमरे यांच्या काही लक्ष्यवेधक कविता | Shabdsanchay Issue - – II,Vol. – I Editor – Prof.Ganesh Saoji Painganga Prakashan,Mehkar Pages – 77 -82 | 978-81-947409-0-2 | January - to February 2021 |
| ३ | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान | तिफण,वर्ष १२ वे अंक दुसरा, जुलै ते सप्टेंबर २०२१ UGC Care Listed Journal,Pages – 29 – 34. | 2331-573X | जुलै ते सप्टेंबर २०२१ |
| ४ | डॉ.कुंडलिक केदारी यांची मुलाखत, पृ.४५९ ते ४६६ | आदिवासी साहित्य : संकल्पना,स्वरूपव वाटचाल संपा.प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे,आविष्कार पब्लिकेशन,तळेगाव दाभाडे,पुणे | 978-81-948864-6-4 | प्र.आ.०५ सप्टेंबर २०२१ |
| ५ | आदिवासी आत्मकथनांची वाटचाल | फडकी,वर्ष १४ वे, अंक १० वा. संपा.श्री.मारूती आढळ | 2319-6033 | १५ सप्टेंबर २०२१ |
| ६ | आदिवासी कविता आणि कादंबरी पृ.४०३ ते ४१४ | परिवर्तनवादी साहित्य:संकल्पना आणि स्वरूप,संपा.डॉ.रामकिशन दहिफळे,स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद (डॉ.वासुदेव मुलाटे गौरवग्रंथ) | 978-81-949714-8-1 | प्र.आ. ०१ नोव्हेंबर २०२१ |

विभागाचे कामकाज करताना संस्थाचालक,प्राचार्य,सहकारी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सेवक, विभागाचे विद्यार्थी इ.सर्वांचे मोलाचे सहकार्य मिळाल्यामुळे विभाग लौकिकास पात्र ठरला आहे.

प्राचार्य
बी. डी. काळे महाविद्यालय
घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे

बी. डी. काळे महाविद्यालय कोड नं. ११६ घोडेगाव

आपला विश्वासू
मराठी विभाग प्रमुख
बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
ता.आंबेगाव जि.पुणे.